Appendix - II

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर.

संदर्भ क्र. अस्थापना/एल.ओ/ /९२-९३ दिनांक:

रजिस्टर ए.डी.

== फायनल ताकीद पत्र ==

प्रति,

श्री.- - - - - - - - - -
- - - - - - - - - - -
- - - - - - - - - - -

आपणास जा.क्र.अस्थापना/एल.ओ.१/९२-९३ दिनांक व जा.क्र.अस्थापना/एल.ओ./ /९२-९३ दिनांक अशी दोन शोकॉज नोटीस बजावणेत आली होती. सदर दोन्ही शोकॉज नोटीसचा लेखी खुलासा आपण केला नाही. कारण आपण विनापरवानगी वारंवार गैरहजर रहाता. आपण व्यवस्थापनाचे पूर्व परवानगीशिवाय अथवा रजा मंजूर करुन न घेता खाली दर्शविलेल्या काळात व नमूद केलेल्या तारखाना गैरहजर आहात.

| अ.नं. | महिना | विनापरवानगी गैरहजर तारखा | गैरहजर दिवस |
|---|---|---|---|
| | | | |
| | | एकूण | |

सतत बरेच दिवस विनापरवानगी गैरहजर रहाणे किंवा मंजुर झालेल्या रजेपेक्षा अधिक काळ योग्य कारणावाचून अगर योग्य अथवा समाधानकारक खुलासा न देता गैरहजर रहाणे हे गंभीर स्वरुपाचे गैरकृत्य आहे.

कारखान्याचे रजेचे नियम नं.१३[३] नुसार रजेशिवाय सतत दहा दिवसापेक्षा अगर त्याहून जास्त दिवस गैरहजर रहाणे म्हणजे आपण नोकरीवरील हक्क गमावणे होय. सदर तुम्ही दोन्ही नियमांचे उल्लंघन केला आहात.

वरील गैरकृत्याचे गांभीर्य लक्षात घेता तुमच्यावर कडक कारवाई करणे जरुरीचे होते. तरी परंतु तुमच्या वर्तनात सुधारणा घडून यावी म्हणून एकवेळ फायनल ताकीद देवून सुधारणा करणेची संधी देणेत येत आहे याची नोंद घ्यावी.

कार्यकारी संचालक.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. हलकर्णी

तालुका-चंदगड, जिल्हा-कोल्हापूर.

जा. क्र. अस्थापना/एल. ॲण्ड डब्लू. ओ/ /९२-९३ दिनांक:

: शो-कॉज नोटीस :

प्रति,
श्री. ----------------------
हुद्दा ----------------------
विभाग --------------------

आमचे असे निदर्शनास आले आहे कि, तुम्ही विनापरवानगी वारंवार गैरहजर रहाता. तुम्ही तुमचे वरीष्ठांचे पुर्व परवानगी शिवाय किंवा रजा न घेता दिनांक पासुन दिनांक अखेर गैरहजर आहात. नेहमी रजा घेतले शिवाय गैरहजर रहाणे अगर सतत बरेच दिवस विनापरवानगी गैरहजर रहाणे किंवा मंजुर झालेल्या रजेपेक्षा अधिक काळ योग्य कारणा वाचून अगर योग्य अथवा समाधानकारक खुलासा न देता गैरहजर रहाणे हे गंभीर स्वरुपाचे गैरकृत्य आहे.

सदरचे कृत्य हे मॉडेल स्टॅण्डिंग ऑर्डर नं. नुसार कारखान्याचे शिस्तीचा आणि नियमांचा भंग करणारे आहे.

वरील परिस्थितीचा विचार करता तुमच्यावर शिस्तभंगाची कडक कारवाई का करु नये ? याचा लेखी समाधानकारक खुलासा सदर शोकॉज नोटीस मिळाले पासुन दोन दिवसाचे आत स्वत: हजर राहून खाली सही करणार यांचेकडे केला नाही किंवा लेखी खुलासा पाठविला नाही तर तुमच्यावर कडक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

कार्यकारी संचालक

प्रत;- १] संबंधित विभाग, २] अस्थापना,
३] लेबर ऑफिस, ४] पर्सनल फाईल,
५] टाईम ऑफिस, ६] मास्टर फाईल.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर.

अंडर पोष्टल सर्टिफिकेट

अेडीएम/एलओ/ /८५-८६ दिनांक:

संदर्भ:- कार्यकारी मंडळ सभा ठराव क्र. दि.

## आरोपपत्र

प्रति,

श्री. ----------------

----------------

तारीख चे खात्याचे व तारीख चे रिपोर्ट वरुन आमचे असे निदर्शनास आलेले आहे की, तुम्ही विना परवानगी वारंवार गैरहजर रहाता. तुम्हास या अगोदर वारंवार विना परवानगी गैरहजर राहिल्याबद्दल शोकॉज नोटीस व ताकीद पत्र देणेत आली आहेत. तरी परंतु तुमच्या वर्तनात सुधारणा झाल्याचे आढळून येत नाही. तुम्ही विनापरवानगी गैरहजर राहिल्याबद्दलचा तपशील खालील प्रमाणे आहे. तसेच बिन पगारी रजेचा तपशिलही आपले माहितीकरिता खाली दिला आहे.

| अ. क्र. | महिना | उपभोगलेल्या बिनपगारी रजेचे दिवस | विनापरवानगी गैरहजर दिवस | विनापरवानगी गैरहजर तारखा |
|---|---|---|---|---|

वरील प्रमाणे दिवस विनापरवानगी माहे याकालावधीत गैरहजर आहात. व बिनपगारी दिवस रजा माहे या कालावधीत रजा उपभोगली आहात. म्हणून तुमच्यावर वारंवार विनापरवानगी गैरहजर रहात असल्याचा आरोप ठेवणेत येत आहे. नेहमी रजा घेतले शिवाय अथवा विना परवानगी गैरहजर रहाणे हे गंभीर स्वरुपाचे गैरकृत्य असुन मॉडेल स्टॅण्डींग ऑर्डर नं. चा भंग झालेला आहे. म्हणून तुमच्यावर सदरचे आरोपपत्र ठेवणेत येत आहे, याबद्दल आपणे काही म्हणणे असलेस सदर आरोपपत्र मिळाले पासुन आठ दिवसाचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी द्यावे.

तुम्ही केलेल्या वरील गैरकृत्याची चौकशी करणेसाठी श्री. यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेत येत असुन ते ज्यावेळी, ज्यातारखेला चौकशी करणेकरिता बोलावतिल त्यावेळी त्याठिकाणी चौकशीला तुम्ही वेळेत हजर रहाणेचे आहे. तुमच्यावर ठेवलेल्या वरील आरोपाची चौकशी पूर्ण होईपर्यंत आपणास कारखान्याचे सेवेतून तारीख पासून निलंबीत [सस्पेंड]करणेत येत आहे, याची नोंद घ्यावी.

कार्यकारी संचालक.

UNIV... HAPUR

प्रत: १] संबंधित खाते
२] चौकशी अधिकारी श्री.
३] एडीएम, ४] टाईम ऑफिस, ५] लेबर ऑफीस
६] पर्सनल फाईल, ७] अकौंट, ८] मा. फाईल.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर.

जा. क्र. अस्थापना/एज. ओ/ /८९-९० दिनांक:

: रजिस्टर ए.डी. :

:ॲडिशनल आरोप पत्र :

प्रति,

श्री. ----------------

आपणास या अगोदर एडीएम/एल. ओ/ ८९-९० तारीख इ. रोजी तारीख ते पर्यंत विनापरवानगी गैरहजर असल्याच्या कारणावरून व्यवस्थापनाने आरोपपत्र दिले होते. तारीख चे आरोपपत्राची खातेनिहाय चौकशी तारीख रोजी आपणास चौकशीला हजर रहाण्याबद्दल पुरेशी संधी दिल्यानंतर एकतर्फी करणेत आली. तरीपण आपण ता. पासुन ता. अखेर विनापरवानगी अथवा रजा मंजुर न करून घेता पुरेशा कामाशिवाय गैरहजर आहात, म्हणून आपल्यावर सदरचे ॲडिशनल आरोपपत्र ठेवणेत येत आहे.

आपण तारीख पासुन पर्यंत विनापरवानगी गैरहजर आहात. सलग दहा दिवसापेक्षा जास्त काळ रजा मंजूर करून न घेता अगर व्यवस्थापनाकडे समाधानकारक खुलासा न करता गैरहजर रहाणे हे गंभीर स्वरूपाचे गैरकृत्य असुन सदर गैरकृत्य आपण केली आहात. म्हणून अशा परिस्थितीत तारीख ते तारीख पर्यंत विनापरवानगी गैरहजर राहिल्याचा या ॲडिशनल आरोपपत्रान्वये आपल्यावर आरोप दुस-यांदा ठेवणेत येत आहे.

आपण केलेले वरील गैरकृत्य कारखान्याचे शिस्तीस व नियमास सोडून असुन मॉडेल स्टॅण्डिंग ऑर्डर मधील स्थायी हुकूम नं. चा भंग झालेला आहे म्हणून आपल्यावर विनापरवानगी गैरहजर राहिल्याचा आरोप ठेवणेत येत आहे. आपल्यावर ठेवलेल्या सदरील आरोपपत्रातील आरोपाविषयी आपले काही म्हणणे असलेस सदर आरोपपत्र मिळाले पासुन पंधरा दिवसाचे आत खाली सही करणार यांचेकडे लेंखी द्यावे.

आपल्यावर ठेवलेल्या सदरील ॲडिशनल आरोपपत्राची चौकशी करणे करिता चौकशी अधिकारी म्हणून श्री. रा. यांची नेमणूक करणेत आलेली असुन चौकशी अधिकारी आपणास ज्यावेळी ज्याठिकाणी चौकशी करिता बोलावतील त्यावेळी चौकशीला वेळेत हजर रहाणेचे आहे याची नोंद घ्यावी

कार्यकारी संचालक.

प्रत:- श्री.

चौकशी अधिकारी यांना चौकशी करून रिपोर्ट सादर करावा.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर.

संदर्भ क्र. अस्थापना/एल.ओ./ /९२-९३ दिनांक:

संदर्भ:- कार्यकारी मिटींग ठराव क्र. दिनांक

: निलंबीत आदेश :

प्रति,

श्री. ------------------

हुद्दा ---------------

विभाग -------------

तुम्हास जा.क्र.अस्थापना /एल.ओ./ / ९२-९३ दि. रोजी आरोपपत्र देण्यात आले होते. तसेच आपणास जा.क्र. अस्थापना/एल.ओ./ /९२-९३ दि. रोजी ॲडिशनल आरोपपत्र देण्यात आले होते. सदर दोन्ही आरोपपत्रांची चौकशी अधिकारी नेमून खातेनिहाय चौकशी करण्यात आली. आपल्यावर ठेवलेल्या वरील दोन्ही आरोपपत्रातील तारीख पासून तारीख पर्यंत विनापरवाना गैरहजर राहिल्याचा आरोप पूर्णपणे शाबीत झाली आहे. कारण चौकशी वेळी सदरील आरोप आपण निर्विवादपणे मान्य करुन व्यवस्थापनाची माफी मागितली आहात.

आपण केलेले वरील गैरकृत्य कारखान्याचे नियमास व शिस्तिस सोडून असून त्यामुळे मॉडेल स्टॅण्डींग ऑर्डर मधील स्थायी हुकूमांचा भंग झाला आहे. म्हणून आपण केलेल्या वरील गुन्हया बाबत शिक्षा म्हणून आपणास ता. पासून ता. पर्यंत दिवस पगाराशिवाय मॉडेल स्टॅण्डींग ऑर्डरमधील तरतूदीनुसार निलंबीत [सस्पेंड] करण्यात येत आहे. आपण तारीख पासून रितसर आपल्या कामावर हजर रहाण्याचे आहे, याची नोंद घ्यावी.

कार्यकारी संचालक.